माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ /५४७६/२०२५/कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| आनंदा बाळू वांजोळे | प्रशासकीय अधिकारी<br>छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर | सहयोगी प्राध्यापक<br>जिवरसायनशास्त्र विभाग,<br>छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर |

**(सुनावणी दिनांक- २२.०४. २०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि.०८.१०.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी समक्ष हजर आहेत, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी ऑनलाईन हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०६.०२.२०२५ | माझा मुलगा आकाश वांजोळे यास दि. ०६.०१.२०२१, दि. ०७.०१.२०२१ चे मध्यरात्री सिपीआर हॉस्पिटल कोल्हापूर येथे उपचारासाठी ॲडमिट केले होते. उपचारादरम्यान तो मयत झाला. तेव्हा त्याचे पोस्टमार्टमही केले होते. त्यावेळी कोरोना विभागातून कोरोना नसलेचा दाखलाही घेऊन उपचार करणारे डॉ. ना दिला होता तेव्हा त्या दिवशीचा केस पेपर व उपचार केलेल्या सर्व कागदपत्रांची प्रत मिळावी. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, “ उपचार करण्यात आलेल्या कागदपत्रांची मागणी केली होती अद्यापपर्यंत उत्तर दिलेले नाही, माहिती मिळाली नाही.” त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी डॉ. राहूल चौधरी यांनी कथन केले की, “ सदर प्रकरणाचे कुठलेही रेकॉर्ड आमच्याकडे आढळून आले नाही . ”

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जाला उत्तर/ माहिती दिल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती आढळून आली नसल्याचे जे प्रतिपादन केले आहे, ते अत्यंत बेजबाबदारपणाचे आहे. माहिती आढळून आली नाही असे विधान करणे म्हणजे केवळ माहिती देण्याचे टाळणे नसून, सरकारी अभिलेख जतन करण्याच्या वैधानिक कर्तव्यात केलेली गंभीर कसूर आहे. एखादी व्यक्ती शासकीय रुग्णालयात उपचार घेते तर तिचे केस पेपर आणि वैद्यकिय उपचारासंबंधित सर्व कागदपत्रे हे सार्वजनिक अभिलेख असतात, ते गहाळ होणे अथवा आढळ न होणे ही बाब

प्रशासकीय यंत्रणेतील अराजकता दर्शवते. जर अभिलेख उपलब्ध नसतील तर त्यामागील कारणांची मिमांसा करणे आणि जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते अधिनियमातील कलम २०(१) नुसार दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत केला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम १९(६) चा भंग केलेला असल्याने ते अधिनियमातील कलम २०(२) नुसार शिस्तभंग विषयक कार्यवाहीस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(दोन) नुसार डॉ. सदानंद भिसे, अधिष्ठाता, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर यांना या प्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाचे आत स्वतंत्र पथक स्थापन करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध घ्यावा. माहिती मिळून आल्यास अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. शोध घेऊनही माहिती मिळून न आल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ चे कलम ८ चे उल्लंघन झाले प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द कार्यालय प्रमुख यांनी गुन्हा दाखल करावा. सदर गुन्हा दाखल केल्याची प्रत व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर यांनी माहिती अर्जावर विहित मुदतीत काहीही कार्यवाही न करुन अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार दंडात्मक कारवाई का करण्यात येवू नये ? याबाबतचा लेखी खुलासा दि.१४ /०५/ २०२६ रोजी आयोगास समक्ष उपस्थित राहून सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

३. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक, जिवरसायनशास्त्र विभाग, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत न करुन अधिनियमाच्या कलम १९(६) चा भंग केलेला असल्याने त्यांचेविरुद्ध अधिनियमाच्या कलम २० (२) प्रमाणे शिस्तभंग विषयक कार्यवाहीची शिफारस का प्रस्तावित करण्यात येऊ नये या बाबतचा लेखी खुलासा दि१४/०५/२०२६ रोजी आयोगास समक्ष उपस्थित राहून सादर करावा.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ /५४७६/२०२५/कोल्हापूर 1990 दिनांक - 28/4/2026

रामाआ-पुणे/२०२५/NSB